ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख २ फेब्रुवारी, १९५५ | अंक ५

## विविध माहिती

**ब्रिटनच्या निर्यातींत पोलाद पहिलें**—१९५४ सालीं ब्रिटननें पूर्वीच्या कोटल्याहि सालापेक्षा अधिक निर्यात केली. ब्रिटननें निर्यात केलेल्या मालाची किंमत २६७०·३ कोटी पौंड भरली आणि आयात करून पुन्हां निर्यात केलेल्या मालाची किंमत १०·१ कोटी पौंड भरली. एकूण निर्यातीपैकी पोलादाची निर्यात सर्वांत अधिक म्हणजे १२·५ कोटी पौंड किंमतीची झाली.

**उद्योगपतीची देणगी**—सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांनीं अहमदाबाद येथील गुजरात विद्या-सभा ह्या संस्थेला २,७५,००० रुपयांची देणगी दिली आहे. देणगीचा विनियोग संस्थेसाठीं नवी इमारत बांधण्याकडे करण्यांत येणार आहे.

**भूदान मोहिमेचें स्मारक**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं १९५० सालीं हैद्राबाद राज्यांतील नलगोंडा जिल्ह्यांतून आपल्या भूदान मोहिमेला प्रारंभ केला. ज्या गांवापासून विनोबांनीं आपल्या यात्रेला प्रारंभ केला त्या गांवीं भूदान-मोहिमेचें स्मारक करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. राज्य-भूदान समितीनें आतांपर्यंत १ लाख एकर जमीन दान म्हणून मिळविली व ३०,००० एकर जमिनीचें वांटप केलें.

**बिहारचें उत्पन्न वाढणार**—दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पूर्ण झाल्यावर बिहार-राज्यसरकारचें उत्पन्न ११ कोटी रुपयांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. बिहार राज्य सरकारनें ज्या विकास-योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे, त्यांच्यामुळें वरील वाढ होईल. राज्याचें सध्यांचें उत्पन्न ३६ कोटी रुपये आहे.

**कच्छमध्यें नवा रेल्वेरस्ता**—कच्छ-मांडवी शहरीं संघानें कच्छ राज्यांत कांहीं नवे रेल्वे-रस्ते बांधण्याची मागणी केली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या रस्त्यांचा समावेश करण्याचा विचार होईल, असें उत्तर रेल्वे बोर्डाकडून संघाला आलें आहे. नव्यानें सुचविलेल्या रेल्वे-रस्त्यांत एक रस्ता गांधीगांव व कच्छ ह्यांना जोडणारा असावा, अशी मागणी करण्यांत आली आहे.

**पेप्सूच्या मंत्र्यांची सोय**—पेप्सु राज्याच्या मंत्र्यांना ह्यापुढें विजेचीं व पाण्याचीं बिलें यावीं लागणार नाहींत. राज्याच्या राजप्रमुखांनीं एक खास हुकूम काढून हीं बिलें सरकारनें द्यावीं असें ठरविलें आहे. त्याशिवाय घरावरील करहि सरकारच भरणार आहे. मंत्र्यांना मिळावयाचीं घरें सुसज्ज असतील.

**रशिआंतील भूगोल परिषद**—सोव्हिएट रशिआंतील जिऑग्रॉफिकल सोसायटीची परिषद ता. ३ फेब्रुआरीपासून मास्को येथें सुरू होणार आहे. संस्थेची स्थापना ११० वर्षांपूर्वी झालेली आहे. परिषदेला भारताचे, चीनचे व इतर ९ राष्ट्रांचे शास्त्रज्ञ हजर रहाणार आहेत.

**गांधीजींच्या पुतळ्यांविषयीं**—महात्मा गांधींच्या पुतळ्याच्या नमुन्याविषयीं आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय राज्य सरकारांनीं असे पुतळे उभारूं नयेत असा हुकूम भारतीय सरकारच्या शिक्षण-खात्यानें काढल्याचें समजतें. सरकारनें मान्यता दिलेल्या शिल्पकारांकडूनच पुतळा तयार करून घेण्याचें बंधनाहि घालण्यांत आलें आहे.

**दिब्रुगड येथील तेलाचें उत्पादन**—आसाम राज्यांतील दिब्रुगड येथील तेलाच्या खाणींचें यंदाचें उत्पन्न मागील कोठल्याहि सालापेक्षा अधिक होईल, असें आसाम ऑइल कंपनीनें जाहीर केलें आहे. चालू सालीं खाणीपासून दररोज ५,४०० पिंपें तेल निघेल असा अंदाज कंपनीनें केला आहे.

**पेशव्यांच्या वाड्याची दुरुस्ती**—बिठूर जवळ गंगा-आश्रम बारदारी ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला पेशव्यांचा जुना वाडा आहे. उत्तर-प्रदेश सरकारनें ह्या वाड्याची दुरुस्ती करून तो ऐतिहासिक वास्तू म्हणून राखण्याचें ठरविलें आहे. वाड्यांत शिवाचें देऊळ आहे. ह्या देवळांत पहिल्या स्वातंत्र्य-युद्धाचे पुढारी नानासाहेब पेशवे पूजा करीत असत, असें म्हणतात. वाड्याच्या दुरुस्तीसाठीं २,००० रुपये खर्च करण्यांत येतील.

**पुराण-वस्तु-शास्त्रज्ञांचा दौरा**—कलकत्ता विद्यापीठाचे प्रो. निर्मलकुमार बोस आणि प्रो. अमृत पांड्या हे दोघे पुराणवस्तु-शास्त्रज्ञ सध्या गुजरातच्या दौऱ्यावर आहेत. महागुजरातमधील प्राचीन सांस्कृतिक अवशेषांची तपासणी करण्याचें कार्य ते करीत आहेत. गुजरातमधील कांहीं मंदिरांचीं वैशिष्ट्यें जाव्हा व कांबोडिआमधील मंदिरांच्या वैशिष्ट्यांशीं जुळतीं आहेत, असें त्यांना आढळून आलें आहे.

**ब्रिटिश शास्त्रज्ञ भारताचा नागरिक ?**—सुप्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ जे. बी. एस. हॉल्डेन नुकतेच भारतांत येऊन गेले. ऑक्सफर्डमध्यें एका प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले, कीं मी भारतांत होतों तेव्हां एका अतिशय सुसंस्कृत समाजांत वावरत होतों असें मला वाटत होतें. युरोपांतील अगर अमेरिकेंतील कोणत्याहि शहरापेक्षा भारतांत मला अधिक घरच्यासारखें वाटतें. भारतानें माझा स्वीकार केला, तर मी त्या देशाचा नागरिक म्हणून मृत्यु पावण्याचा संभव आहे.

**माध्यमिक शाळांच्या पुस्तकांचें प्रदर्शन**—युनायटेड स्टेट्स एज्युकेशनल फौंडेशन इन इंडिया ह्या संस्थेनें अमेरिकेंतील माध्यमिक शाळांतून लावण्यांत आलेल्या पाठ्यपुस्तकांचें एक प्रदर्शन मद्रासमध्यें भरविलें होतें. प्रदर्शनांत संगीत, कला, शास्त्रें, नाट्य, औद्योगिक कला, वृत्तपत्र, व्यवसाय, इत्यादि विषयांवरील ५०० पुस्तकें ठेवण्यांत आलीं होतीं.

**नंदीकोंडा विकास-योजना**— आंध्र सरकार व हैद्राबाद सरकार ह्या दोघांनीं मिळून अंमलांत आणावयाच्या नंदीकोंडा विकास-योजनेचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत येणार आहे. दोन्ही राज्यांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक योजना-समितीनें चालू महिनाअखेर बोलाविली आहे. योजनेसाठीं १२० कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे.

**मध्य भारतामधील धान्याचे घसरते भाव**—भारतामधील इतर राज्यांप्रमाणें मध्य भारतांतहि धान्याचे भाव घसरत चालले आहेत. राज्य सरकारनें धान्याचे किमान भाव जाहीर केले असून त्याखाली ते घसरल्यास सरकार किमान भावानें शेतकऱ्यांपासून धान्य खरेदी करणार आहे. किमान भाव पुढीलप्रमाणें ठरविले आहेत. ज्वारी ५॥ रु. मण, मका ४॥ रु. मण आणि बाजरी ६ रु. मण.

**श्री. अरविंदांचें स्मारक**—श्री. अरविंद घोष ह्यांचें बडोद्यांत स्मारक करण्याचें घाटत आहे. ते बडोदा कॉलेजमध्यें कांहीं वर्षें प्राध्यापक होते. बडोदा येथें ज्या घरांत ते रहात होते त्या घराच्या मालकानें तें स्मारकासाठीं देण्याचें कबूल केलें आहे, असें समजतें. जगांतील प्रमुख भाषा व संस्कृति ह्यांचें केंद्र येथें स्थापन करण्याचा विचार करण्यांत येत आहे.

**मि. चर्चिल ह्यांचें नवें पुस्तक**—ब्रिटनचे पंतप्रधान मि. चर्चिल ह्यांनीं लिहिलेल्या नव्या पुस्तकाचें प्रकाशन लवकरच होणार आहे. पुस्तकाचें नांव 'इंग्लिश भाषा बोलणाऱ्या लोकांचा इतिहास' असें आहे. दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच त्यांनीं हें पुस्तक लिहिण्यास प्रारंभ केला होता. पुस्तकाचे एकूण तीन किंवा चार खंड होतील.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

## समाजवादी अर्थरचना

## ★ शेटजी नको ॥ लक्षाधीश नको ★

**मध्यम वर्गानें प्रत्येकीं एक हजार रुपये भांडवल द्यावयाचें याप्रमाणें भांडवल जमलें; सिंडिकेट यशस्वी झाली**

**मध्यम वर्गाचा झालेला फायदा**

**(१) नवीन १००० टनांच्या मशिनरीनें:—१,००,००० (एक लक्ष) पोतीं साखर**
**(२) जुन्या २५० टनांच्या मशिनरीनें:—५०,००० (पन्नास हजार) पोतीं साखर**

**उत्पादनांत कायमची वाढ:—५०,००० (पन्नास हजार) पोतीं साखर**

## साखरेच्या एका पोत्याचा भाव रुपये ७० प्रमाणें

नवीन मशिनरी : एक लक्ष पोतीं साखरेचे : ७०,००,००० रुपये
जुनी मशिनरी : पन्नास हजार पोतीं साखरेचे : ३५,००,००० रुपये

उत्पादनांत कायमची वाढ : ३५,००,००० रुपये
(पस्तीस लक्ष रुपये)

ज्यांना सवड आहे त्यांच्या ठेवी घेऊन ज्यांना सवड नाहीं त्यांच्या ठेवी परत केल्या जातात.
जास्त व्याजाचा फायदा ठेवीदारांना मिळतो.

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. २४-१-१९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ९ फेब्रुवारी, १९५५





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## १९५५ चा आशादायक प्रारंभ

### वाढतें उत्पादन, वाढत्या ठेवी, वाढता विश्वास

१९५३ सालच्या अखेरीस अमेरिकेंत मंदीचीं चिन्हें किंचित् दिसूं लागलीं व तिच्या जागतिक आर्थिक परिणामांबद्दल जगांतील इतर ठिकाणच्या अर्थशास्त्रज्ञांना चिंता वाटूं लागली. १९५४ च्या प्रारंभींची परिस्थिति भीतिदायक नव्हती, पण जपून चालण्याचा इशारा देण्याइतपत सूचक होती. तथापि, प्रत्यक्ष अनुभव वाईट आला नाहीं. १९५४ च्या दुसऱ्या सहामाहींत तर अमेरिकेप्रमाणें इतत्रहि आर्थिक परिस्थिति तेजीची राहिली. भारतापुरता विचार केला, तर चहाला किंमत चांगली आली, तागाची निर्गत वाढली आणि कपास कापडाची परराष्ट्रीय बाजारपठहि सुधारली. अन्न धान्यांच्या बाबतींत भारत स्वावलंबी झाला आणि आयात केलेल्या मालाचा मोबदला देण्यास अडचण वाटली नाहीं. रिझर्व्ह बँकेचे तक्ते, शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति, रोख्यांच्या किंमतींचे इंडेक्स नंबर, औद्योगिक उत्पादनाचे इंडेक्स नंबर, ह्या सर्वांची छाननी केली असतांना, गेल्या वर्षाच्या सुस्थितीबद्दल समाधान व १९५५ बद्दल आशा वाटण्यास हरकत दिसत नाहीं. तक्त्यांवरून असें आढळून येईल कीं, १९५३ अखेर जेवढ्या चलनी नोटा व्यवहारांत होत्या, त्यांत १९५४ अखेर ६७·३४ कोटी रुपयांच्या नोटांची वाढ होऊन त्यांचा आंकडा १२०० कोटी रुपयांवर गेलेला आहे. सबंध वर्षभरच पैशाला भरपूर मागणी राहिली. मध्यवर्ती सरकारच्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवी ५९ कोटी रुपयांनीं कमी झाल्या आहेत. नव्या कर्जाच्या स्वरूपांत सरकारला १५७ कोटी रुपये मिळाले, ते मिळाले नसते तर ठेवींत आणखी घट झाली असती.

शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितींत हिंदी आर्थिक प्रगतीची लक्षणें चांगल्या रीतीनें उमटलेलीं आहेत. बँकांकडील ठेवींत घट होण्याची कांहीं वर्षांची प्रवृत्ति आतां आटोक्यांत आलेली आहे, इतकेंच नव्हे, तर गेल्या वर्षांत ठेवींत ९४ कोटींची भरघोस वाढ झालेली दिसत आहे. ह्या वाढीपैकीं ५०% रक्कम सरकारी रोख्यांत साधारणतः गुंतविली जावयाची, पण त्यांतील गुंतवणूक फक्त १३ कोटी रुपयांनींच वाढली. शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेजवळील शिल्लक पुष्कळच वाढवून ती ४५ कोटी रु. ची ६६ कोटी रु. केली. म्हणजे, तींत सुमारें ५०% वाढ झाली आहे. कॉलमनींतहि १० कोटींची वाढ आढळते. नवीन कर्जाच्या कांहीं अपूर्व वैशिष्ट्यामुळें सरकारी रोख्यांच्या बाजारावर जरा प्रतिकूल परिणाम झाला व त्यांच्या किंमतीचा इंडेक्स स्थिर राहिला. त्याच मुदतींत औद्योगिक शेअर्सच्या किंमतींचा इंडेक्स ९८·० वरून ११४·२ वर गेला, म्हणजे १६·२ नें सुधारला. औद्योगिक सुधारणेचें इष्ट असें प्रतिबिंब सरकारी रोख्यांवर पडलें नाहीं. औद्योगिक उत्पादनांतील वाढीचे आंकडे नजरेखालून घातले, म्हणजे शेअर्सवरील वाढलेल्या जनविश्वासाचा आधार लक्षांत येतो. सध्याची परिस्थिति एक वर्षापूर्वीच्या परिस्थितीपेक्षा अधिक आशादायक आहे. वाढतें औद्योगिक उत्पादन व बँकांकडील वाढत्या ठेवी, ह्यांमुळें सरकारची पत आणखी सुधारून पंचवार्षिक योजनेस अधिक पैसा उपलब्ध होईल, हें उघड आहे.

#### चलन

( कोटी रुपयांचे आंकडे )

| | १-१-५४ | ३१-१२-५४ | वाढ किंवा घट |
|---|---|---|---|
| व्यवहारांतील नोटा | ११३२·१५ | १२००·४९ | + ६८·३४ |
| बँकिंग खात्यांतील नोटा | १३·८२ | २३·०१ | + १२·१९ |
| विदेशी रोखे | ५८८·१५ | ६६३·१५ | + ७५·०० |
| रुपये | ९६·४२ | १०५·५८ | + ९·१६ |
| भारतीय रोखे | ४२१·३८ | ४१७·७५ | – ३·६३ |
| मध्यवर्ती सरकारच्या ठेवी | ११३·४३ | ५४·८९ | – ५८·५४ |
| राज्य सरकारांच्या ठेवी | १९·४८ | १६·७४ | – २·७४ |
| बँकांच्या ठेवी | ४८·७० | ६९·१३ | + २२·४३ |
| इतर ठेवी | ५८·३५ | ३४·३९ | – २३·९६ |
| परदेशांतील शिलका | १३९·२२ | ६७·६४ | – ७१.६८ |
| इतर कर्जें | १६·०५ | २१·२९ | + ५.२४ |
| इनव्हेस्टमेंटस् | ७६·२५ | ७५·३४ | – ०·९१ |
| विदेशी रोखे | ७२७·४७ | ७३०·७९ | + ३·३२ |
| भारतीय रोखे | ४९७·६३ | ४९३·०९ | – ४.५४ |

#### शेड्यूल्ड बँका

( कोटी रुपयांचे आंकडे )

| | २५ १२ ५३ | २३·१२·५४ | वाढ अथवा घट |
|---|---|---|---|
| डिमांड देणीं | ५१६·३१ | ५७४·९८ | + ५८·६७ |
| टाइम देणीं | ३३१·८१ | ३६७·२२ | + ३५·४१ |
| रोख | ३२·०८ | ३२·०३ | – ०·०५ |
| रिझर्व्ह बँकेंत शिल्लक | ४४·५८ | ६५·६३ | + २१·०५ |
| कॉल व शॉर्ट नोटीस मनी | १२·७१ | २२·३९ | + ९·६८ |
| इनव्हेस्टमेंटस | ३३६·०४ | ३४८·९८ | + १२.९४ |
| कर्जें | ४६१·०९ | ५३७·१४ | + ७६·०५ |

#### रोख्यांच्या किंमतींचा इंडेक्स नंबर

( १९४९–५० = १०० )

| | १९-१२-५३ | १८·१२-५४ | वाढ अथवा घट |
|---|---|---|---|
| सरकारी, निम-सरकारी रोखे | ९०·३ | ९०·४ | + ०·१ |
| औद्योगिक कंपन्यांची डिबेंचर्स | १०१·६ | १००·७ | – ०·९ |
| प्रेफरन्स भाग | ८७.८ | ८८·१ | + ०·३ |
| औद्योगिक कंपन्यांचे ऑर्डिनरी भाग | ९८·० | ११४.२ | + १६·२ |

## घाऊक किंमतींचे इंडेक्स नंबर

ऑगस्ट, १९३९ अखेरचें वर्ष = १९०

| | १२-१२-५३ | ११-१२-५४ | वाढ अथवा घट |
|---|---|---|---|
| अन्नपदार्थ | ३६३.४ | ३१८.४ | – ४५.० |
| औद्योगिक कच्चा माल | ४५२.० | ४३८.३ | – १३.५ |
| अर्ध-पक्का माल | ३५६.० | ३४८.० | – ८.० |
| पक्का माल | ३६३.८ | ३७६.१ | + १२.३ |
| इतर | ७१०.६ | ५८३.४ | – १२७.२ |
| एकूण | ३८७.० | ३६८.८ | – १८.२ |

## औद्योगिक उत्पादन

( १९४६–१०० )

| | सप्टें. १९५३ | सप्टें. १९५४ | वाढ अथवा घट |
|---|---|---|---|
| कपास कापड | १२३.३ | १२८.२ | + ४.९ |
| कपास सूत | १११.९ | ११६.६ | + ४.६ |
| ताग | ८१.६ | ८८.२ | + ६.६ |
| लोकरी माल | ८९.५ | ७८.४ | – ११.१ |
| पोलाद | ९६.४ | १२९.३ | + ३२.९ |
| सिमेंट | २४३.० | २८५.१ | + ४२.१ |

## हिंदी आर्थिक प्रगति

### "भारतानें चीनचें अनुकरण करूं नये ह्यासाठीं त्याला मदत केली पाहिजे"

सुप्रसिद्ध ब्रिटिश 'एकॉनॉमिस्ट' साप्ताहिकानें २१ जानेवारी रोजीं एक २० पृष्ठांची भारतविषयक पुरवणी प्रसिद्ध करून भारतानें गेल्या सात वर्षांत केलेल्या प्रगतीबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा, पुरवणींमध्यें आढावा घेण्यांत आला असून पाश्चात्य देशांना भारतांत भांडवल गुंतविण्यास धोका वाटण्याजोगी परिस्थिति नाहीं, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. "भारताचें सरकार शक्तिमान, टिकाऊ व कार्यक्षम आहे, पण त्यानें आपली शक्ति व कार्यक्षमता ह्यांचा उपयोग लोकांचीं मनें वळवून त्यांना आपल्या मागोमाग आकर्षण्याकडे केला आहे; त्यांच्यावर बळजबरी करण्याकडे किंवा त्यांना हांकत नेण्याकडे केलेला नाहीं. भरमसाट औद्योगीकरण किंवा बचत करण्याचा जुलूम, हे मार्ग भारतानें अवलंबिलेले नाहींत. शेतकऱ्यावरच सबंद 'पिरॅमिड' उभा आहे, पण त्याच्याकडे जबाबदार व तारतम्य जाणणारा नागरिक ह्या दृष्टीनेंच पाहिलें जात आहे; गुन्हेगार किंवा बहिष्कृत ह्या दृष्टीनें नाहीं. त्याबरोबरच त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला जातो, ह्याचा अर्थ सरकारचा कमकुवतपणा, असाहि होत नाहीं. युद्धाच्या खाईतून, कोरियन महागाईतून व १९५१ च्या अवर्षणांतून देशाचें संरक्षण करून आर्थिक स्वास्थ्य निर्माण करण्यांत आलें आहे, त्याचें प्रत्यंतर सर्वांस मिळत आहे चांगल्या भावनांपेक्षा भीतीनींच पाश्चात्य लोकसत्ताक राष्ट्रें हातपाय हलविण्यास सत्वर प्रवृत्त होतात; तेव्हां भारतानें चीनचें अनुकरण केलें तर पाश्चात्य राष्ट्रांना दारूगोळा, आर्थिक आपत्ति आणि जागतिक वातावरणांत भीतीच्या आवरणाचा संभव ह्या दृष्टीनें किती जबर किंमत द्यावी लागेल, ह्याचा अंदाजच केलेला बरा. त्या अंदाजाचा विचार केला, म्हणजे भारताच्या उद्धाराच्या योजनांत पैसा उपयुक्तपणें आणि प्रभावी रीतीनें गुंतविणें कितीतरी स्वस्त व सोईस्कर होणार आहे."

## हैद्राबाद राज्यांतील वैद्यकीय मदत

हैद्राबाद राज्यांतील लोकांना वैद्यकीय मदतीबद्दल राज्य-सरकारच्या आरोग्यमंत्र्यांनीं पुढीलप्रमाणें माहिती जाहीर केली आहे. त्यांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें भारतीय सरकार राज्यांतील महारोग्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं २ केंद्रें स्थापन करणार आहे. हीं केंद्रें १९५५ च्या जानेवारीपासून सुरू होणार असून ८० खेड्यांतील १॥ लाख लोकवस्तीला त्यांचा फायदा मिळेल. त्याशिवाय राज्य–सरकारकडून ८ लाख रुपयांची रक्कम मदती दाखल मिळणार आहे. ह्या रकमेचा विनियोग कुटुंब हित-योजना, परिचारिकांचें शिक्षण, इत्यादि कामासाठीं मुख्य : करण्यांत येणार आहे. जागतिक आरोग्य–संघटना व संयुक्त राष्ट्र संघ ह्यांच्याकडून मलेरिया विरोधी योजनांसाठीं ३७ लाख रुपयांचीं साधनें मिळालीं होतीं. त्यांचा उपयोग करून मलेरिआवर नियंत्रण ठेवण्यासाठीं ४ केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. ह्या केंद्रांचा उपयोग ४० लाख लोकवस्तीच्या भागाला होत आहे. अशींच आणखी दोन केंद्रें स्थापन करण्यांत येण्याचा संभव आहे. राज्य–सरकारचा असा विचार आहे, कीं राज्यांतील २० वर्षांखालील वयाच्या प्रत्येक व्यक्तीचें क्षयरोगापासून संरक्षण करण्यांत यावें. त्यासाठीं बी. सी. जी. लस टोंचण्याचा सरकारचा विचार आहे. आतांपर्यंत ५ लाख लोकांना ही लस टोंचून झाली आहे. हैद्राबाद येथील मेडिकल कॉलेजांत प्रवेश मिळविण्यासाठीं अधिकाधिक विद्यार्थ्यांचे अर्ज येत असतात. पण विद्यार्थ्यांची मागणी पुरी करण्यासाठीं कॉलेजाला इमारतीची जरूर आहे. कॉलेजसाठीं ३ मजल्यांची नवी इमारत बांधण्याचा सरकारचा विचार असून जरूर त्या आर्थिक मदतीसाठीं भारतीय सरकारकडे विचारणा करण्यांत आली आहे.

## भारताचा परदेशी व्यापार

कांहीं दिवसांपूर्वी भारतीय सरकारनें हंगेरीशीं व्यापार करण्याची एक संधि साधली नाहीं अशी वार्ता आली होती. हंगेरीनें भारताला दोन कोटी रुपयांचा माल उधारीनें देण्याची तयारी दाखविली होती. परंतु ही रक्कम फार लहान असल्यानें सरकारनें तिचा फायदा घेतला नाहीं असें समजतें. भारत आपला परदेशीय व्यापार वाढविण्याच्या खटपटींत असतांना सरकारच्या नकाराबद्दल कांहीं ठिकाणीं आश्चर्य व्यक्त करण्यांत येत आहे. हंगेरी हा देश कम्युनिस्ट राजवटीखालीं गेल्यावर मध्य व पूर्व युरोपांतील इतर देशांप्रमाणें तेथेंहि औद्योगीकरण झपाट्यानें करण्यांत आलें. त्यामुळें हंगेरीला आपल्या पक्क्या मालासाठीं बाजारपेठा शोधणेंहि क्रमप्राप्तच झालें भारताकडून उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांतच होणाऱ्या कच्च्या मालाची गरजहि हंगेरीला भासूं लागली असेल. अर्थात् हंगेरीशीं व्यापार करण्याची संधि भारताच्या हिताच्या दृष्टीनें राबविता येण्यासारखी होती अशी टीका करण्यांत येत आहे. लिपझिग येथें ७०० वर्षांपासून भरणाऱ्या औद्योगिक प्रदर्शनाबाबतहि सरकारनें प्रथम फारशी आस्था दाखविली नाही असें समजतें. तथापि नंतर बऱ्याच खाजगी व्यापारी संघटनांना ह्या प्रदर्शनांत भाग घेण्याची विनंती सरकारकडून करण्यांत आली आहे. मिरी, तंबाखू, काजू-बिया, इत्यादींचा व्यापार करणाऱ्यांना आपला माल प्रदर्शनांत मांडण्याची सूचना सरकारनें केली आहे. भारतांत पूर्व-जर्मन सरकारचें एक व्यापारी प्रतिनिधी मंडळ आलें आहे. लिपझिग येथील प्रदर्शनांत भारतीय व्यापाऱ्यांनीं व धंदेवाल्यांनीं भाग घ्यावा म्हणून मंडळानें बरेच प्रयत्न केले. इंडियन कौन्सिल ऑफ फॉरिन ट्रेड ह्या खाजगी संघटनेनेंहि प्रदर्शनांत भाग घेण्याविषयीं प्रयत्न केले.

# प्रो. काळे ह्यांच्या कार्यपद्धतीचें दर्शन

## मृत्युदिनाचे निमित्तानें उद्‌बोधक आठवणी

प्रो. वा. गो काळे ह्यांचा, त्यांच्या घरीं मी अखेरचा निरोप घेतला, त्याला फार काळ लोटला नाहीं, असें वाटण्याइतकी त्याची आठवण ताजी आहे. त्यांची पुनः भेट होण्याचा योग नव्हता. पुढें एका महिन्यानंतर, मी फिरतीवर असतांना, त्यांच्या मृत्यूची बातमी मी वाचली तेव्हां, त्यांच्या दुखण्याचा गंभीरपणा मला माहीत होता तरी सुद्धा, फार मोठा धक्का बसला. शहाणा सल्लागार आणि गरजेच्या वेळीं हमखास धीर देणारा किंवा सांत्वन करणारा, अशा एकाद्या थोरल्या भावासच मुकल्यागत मला वाटलें.

कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें प्रो. काळे व माझे वडील हे एकाच वेळीं सहकारी होते, त्यामुळें त्यांची माहिती मला होण्याचें प्रयोजन घडलें. एक नामवंत शिक्षणतज्ज्ञ आणि भारतीय अर्थशास्त्रावरील बहुधा पहिल्याच ग्रंथाचा कर्ता, ह्या दृष्टीनें मला त्यांच्याबद्दल आदर वाटूं लागला.

१९२५ मध्यें पुणें येथें एका सहकारी परिषदेंत, शेतकीपतपेढ्यांच्या सभासदांसाठी नॉर्मल क्रेडिटसची पद्धत सुरू करण्याबाबत कांहीं शंका त्यांनीं उपस्थित केल्या, तेव्हां त्यांच्या मुद्यांना उत्तर देण्याची कामगिरी माझ्याकडे आली. तिच्या आकस्मिकपणामुळें, मी जरा चाचरतच थोडक्या शब्दांत खुलासा केला, तो मला स्वतःला मुळींच समाधानकारक वाटला नाहीं. पण प्रो. काळे ह्यांचें समाधान झालें असावें; कारण त्यांनीं त्या प्रश्नाचा आणखी आग्रह धरला नाहीं. सिद्धांतांतील दोषस्थळें अचूक शोधण्याचे व त्यांकडे लक्ष वेधण्याचे कामीं ते सदैव जागरूक असत; पण त्यांचें तारतम्य इतकें यथार्थ असें कीं किरकोळ बाबींवरील विवादांत ते लक्ष घालीत नसत. तथापि, तत्त्वाचा प्रश्न आला, कीं ते पर्वतासारखे अढळ असत.

१९२९–३० मध्यें मुंबई प्रांतिक बँकिंग चौकशी कमिटीवर आम्हां दोघांना एकत्र काम करावें लागलें, तेव्हांपासून प्रो. काळे ह्यांचेशीं माझ्या वैयक्तिक संबंधास प्रारंभ झाला. कमिटीचे नऊ सभासद होते; पण बऱ्याच वेळा घडतें त्याप्रमाणें, जेव्हां फिरती सुरू झाली तेव्हां सभासदांची संख्या पांचावर आली. सर जनार्दन मदन (चेअरमन), श्री आर. पी. मसानी (सभासद–चिटणीस), श्री. वी. एस. कामत, प्रो वा. गो. काळे व मी, असे ते सभासद होत लहानशा आनंदी कुटुंबांत कमिटीचें रूपांतर झालें; विशेषतः आम्हीं दोघें फिरतीच्या बहुतेक ठिकाणीं एकत्र राहूं लागलों. माथेरान येथें अहवालाच्या मसुद्यावर चर्चा सुरू होती, त्यावेळीं सुदैवानें प्रो. काळे माझ्याबरोबर रहात होते. प्रत्येक दिवशीं, सकाळीं आणि रात्रीं आम्हीं मसुदा एकत्र बसून वाचीत असूं. मसुद्याची एक एक ओळ मी वाचून दाखवावी आणि त्यांनीं त्याची चर्चा करावी किंवा दुरुस्ती करावी, असा क्रम चाले. विद्यार्थ्यांनीं शिक्षकांना सादर केलेल्या निबंधाच्या तपासणीची उपमा त्याला देतां येईल! अखेरच्या अहवालाची वाखाणणी झाली, त्याचें बऱ्याच अंशीं श्रेय प्रो. काळे ह्यांनीं प्रत्येक शब्दाची काळजीपूर्वक छाननी केली आणि अहवालाचे सर्व भाग एकमेकांशीं सुसंगत व्हावेत ह्याची दक्षता घेतली, ह्यासच दिलें पाहिजे. ह्यावेळीं, कमिट्यांच्या कार्यपद्धतीबाबत मी जे धडे शिकलों, ते कधींहि विसरणें शक्य नाहीं.

प्रो. काळे ह्यांचा व माझा सुमारें १५ वर्षें अत्यंत निकटचा संबंध होता, त्या मुदतींत त्यांचीं इंग्रजी व मराठी भाषणें ऐकण्याची कितीतरी वेळां मला संधि मिळाली; त्यांनीं इंग्रजींत केलेलें बहुतक सर्व लिखाण मी वाचलें आहे. ज्या वाचकवर्गास उद्देशून लिहावयाचें, त्यास कोणती पद्धत पटेल, ह्याचा अंदाज करून त्याला अनुसरून, ते लिहिण्याची धाटणी बदलीत असत. त्यांच्या सर्व लेखनांत साधेपणा, स्पष्टपणा, सुबोधता आणि यथायोग्यपणा असावयाचा. भाषा नेहमीं निर्दोष व शुद्ध आणि विचारांची मांडणी व्यवस्थित केलेली असावयाची. वक्ता ह्या दृष्टीनें पाहिलें, तर त्यांचीं भाषणें आदरपूर्वक ऐकलीं जात आणि ज्या ज्या वेळीं मी त्यांच्या भाषणास उपस्थित होतों, त्या त्या वेळीं लोक एकाग्रतेनें, लक्षपूर्वक ऐकत असल्याचें मला आढळलें आहे. त्याचें कारण म्हणजे, श्रोत्यांना माहीत असें, कीं प्रो. काळे ह्यांच्या जवळ कांहीं तरी महत्त्वाचें सांगण्याजोगें असणारच, आणि तें उपस्थितांना समजेल अशा पद्धतीनेंच ते सांगणार. वक्तृत्वाच्या भराऱ्यांत गर्क असणाऱ्या लोकांना वक्त्याच्या ह्या आवश्यक गुणाचें बहुधा विस्मरण पडतें.

प्रो. काळे ह्यांचा स्पष्टवक्तेपणा लोकांना कधींकधीं गैरसमजामुळें आक्रमक वाटला असेल. विषयाला सरळ हात घालणें व उघडपणें बोलणें हे गुण त्यांच्यांत निःसंशय होते; परंतु स्वतःचें घोडें दामटण्याच्या वृत्तीचा यत्किंचितहि अंश त्यांच्यांत मला आढळला नाहीं. सुविख्यात राष्ट्रीय कार्यकर्ते निर्माण करणाऱ्या संस्थेचे ते एक प्रतिष्ठित सभासद होते आणि महर्षि महादेव गोविंद रानडे ह्यांच्या पायाशीं शिष्यत्व लाभल्याबद्दल त्यांना अभिमान वाटत असे. सार्वजनिक कार्य ते समाजाचे सेवक ह्या नात्यानेंच नेहेमीं करीत असत. प्रसिद्धीची त्यांनीं कधींच अपेक्षा धरली नाहीं, परंतु सेवा करण्याची संधि मिळाली तर प्रसंगोपात जागा विभूषित करण्याची त्यांनीं टाळाटाळहि केली नाहीं.

प्रो. काळे ह्यांच्याविषयीं त्यांच्या विद्यार्थ्यांत किती पूज्य बुद्धि आणि प्रेम ह्यांची प्रेरणा झालेली होती, ह्याची मला माहिती आहे. तीस वर्षांहून अधिक काळ, अशा विद्यार्थ्यांचे विचार व आयुष्य ह्यांस वळण लावण्याचें त्यांचें कार्य चालूं होतें. मी स्वतः त्यांचा विद्यार्थी कधींच नव्हतों; कारण ते मला नेहेमीं बरोबरीचा सहकारी व मित्र असेंच मानीत असत. परंतु, मी त्यांचेपासून इतकें शिकलों आहे आणि त्यांच्याशीं वाढलेल्या मैत्रीचें मला इतकें महत्त्व वाटतें, कीं गतकालाकडे वळून, माझा व त्यांचा सहवास ह्याची आठवण करतों तेव्हां त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धि आणि ममता हे शब्द वापरण्यास मला संकोच वाटत नाहीं.

दि. २७–१–५५ वैकुंठ ल. मेहता

## रशियांतील बँकिंगची व्यवस्था

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या सरकारी योजनानुसार संपत्तीचा सांठा करण्याचें व त्याची व्यवस्था ठेवण्याचें महत्त्वाचें कार्य सोव्हिएट युनियनच्या समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेंत बँका करीत असतात.

सोव्हिएट युनियनमधील सर्व बँका सरकारी मालकीच्या असून त्यांचें कार्य इतर सर्व आर्थिक व्यवहारांप्रमाणेंच नफ्याच्या हेतूनें न होता, लोकांच्या कल्याणासाठी अर्थव्यवस्थेचा झपाट्यानें विकास व्हावा, यासाठींच होत असतें.

सोव्हिएट युनियनमध्यें पुढीलप्रमाणें बँका आहेत. सरकारी (स्टेट) बँक, परदेशी व्यापार बँक, औद्योगिक बँक, शेतकी–बँक, व्यापार व सहकारी संघटना यांच्या मूलभूत उभारणीसाठीं भांडवल पुरविणारी बँक, मध्यवर्ति म्युनिसिपल बँक आणि स्थानिक म्युनिसिपल बँका. या सर्व बँकांचें विशिष्ट असें कार्य असतें आणि त्यांत सरकारी बँकेचें कार्य सर्वांत अधिक व्यापक स्वरुपाचें असतें. सरकारी बँक सरकारी व सहकारी कारखान्यांना अल्पकालीन कर्ज म्हणून रक्कम देत असते, त्यांची रोख रक्कम सांभाळीत असते, हिशेब राखून चलनावर नियंत्रण राखते. चलन जारी करण्याचा हक्क केवळ ह्याच बँकेला असतो.

सरकारी बँकेच्या सुमारें २०० याच प्रमख कचेऱ्या असून सर्व शहरांतील, ग्रामीण विभागांतील व कांहीं बड्या कारखान्यांतील शाखा–कार्यालयांची संख्या ५,००० च्या वर आहे.

प्रत्येक कारखान्याला आपल्या योजनेनुसार कच्चा माल, आवश्यक सामुग्री, मजुरी व इतर खर्चासाठीं रोख रकमेची आवश्यकता असते. सरकार आपल्या कारखान्यांना कायम उपयोगासाठीं कांहीं रक्कम देत असते. ही रक्कम कारखान्याचें स्वतःचें कामचलाऊ भांडवल समजलें जातें व त्याचा वापर बहुधा कच्चा माल, आवश्यक सामुग्री व तयार माल यांसाठी होत असतो; पण अनेकदां कारखान्यांना हंगामाच्या प्रसंगीं कच्चा माल हिंवाळ्यासाठीं जळण वगैरे खरेदी करण्यासाठीं जादा भांडवलाची गरज पडते. ती गरज सरकारी बँक अल्पकालीन कर्ज देऊन भागवीत असते.

किरकोळ व्यापारी–संस्थांना मालाची घाऊक खरेदी करण्यासाठी मालाच्या किंमतीच्या ४० टक्क्यांपर्यंत रक्कम मिळते, तर सहकारी व्यापारी संघटनांना ती ८५ टक्क्यांपर्यंत मिळते. ही तरतूद सहकारी संघटनांचा विकास करण्यासाठीं केलेली आहे. सामुदायिक शेतांना व निर्मात्यांच्या सहकारी संस्थांनाहि सरकारी बँक कर्ज देत असते.

साऱ्या देशाच्या अर्थव्यवहाराची देवाण–घेवाण करण्याचें सरकारी बँक हें मुख्य स्थान आहे. लहान–सहान हिशेबांखेरीज सर्व कारखान्यांचे पैशाचे व्यवहार सरकारी बँकेमार्फत होत असतात. कारखाने आपसांतील देण्याघेण्याची व्यवस्था सरकारी बँकेमधून करतात.

अल्पकालीन कर्ज देण्याच्या व देण्याघेण्याचे व्यवहार करण्याच्या सार्वत्रिक कार्यामुळें, सरकारी बँकेला सर्व कारखान्यांच्या कार्यावर परिणामकारक असें नियंत्रण राखतां येतें. कर्ज देतांना आपल्या योजना यशस्वी पार पाडणाऱ्या कारखान्यांना सरकारी बँक प्राधान्य देत असते. व योजना पार पाडण्यांत कुचराई करणाऱ्या कारखान्यांना कर्ज देतांना त्यांच्यावर निर्बंध घालते; अशा प्रकारें प्रत्येक कारखान्याच्या कामांत सरकारी बँक सुधारणा घडवून आणण्यास उपयोगी पडते.

मध्या, सुरेश आणि सौजन्याचें प्रतीक
१९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
अधिकृत भांडवल रू. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रू. ७२७,३००
रिझर्व रू. ६,१६,००८
ठेवी रू. १,
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

चलनावरील नियंत्रणाची योजना सरकारी बँक कांहीं तत्त्वांवर आधारीत असते, सर्व कारखाने व लोकोपयोगी व्यवस्था आपल्या विक्रीचे व कामाचे आलेले पैसे सरकारी बँकेंत आपल्या खात्यांत जमा करतात व जेव्हां पगारासाठी व इतर कार्यासाठी पैसे लागतात त्यावेळीं आपल्या खात्यांतून तेवढी रक्कम घेतात. बँकेची जमा व व्याज योजनेनुसार आगाऊ ठरविण्यांत येतात.

परदेशी व्यापारांतील रकमांची देवाणघेवाण परदेशी व्यापार बँक सरकारी बँकेसह करीत असते. सोविअत युनियनमधील इतर बँकांचें कार्य उभारणीकार्यासाठीं भांडवलाची तरतूद करणें हें असतें. सरकारी कारखान्यांमार्फत व इतर संस्थांमार्फत मूलभूत उभारणीसाठीं देण्यांत येणारी रक्कम परत करावयाची नसते. ठराविक योजनांबाहेर रकमांचा विनियोग होत नाहीं. यावर नियंत्रण ठेवण्याचें कार्य उभारणीकार्यासाठीं कर्ज देणाऱ्या बँकांचें असतें.

सहकारी संघटनांना मूलभूत उभारणीकार्यासाठीं दीर्घकालीन कर्जाच्या स्वरूपांत रक्कम बँकांकडून मिळत असते. शेतकी बँक व मध्यवर्ति म्युनिसिपल बँक निवासस्थानें बांधण्यासाठीं व्यक्तींना कर्ज देत असते. घरें बांधण्यासाठीं सवलतीच्या दरानें दहा वर्षांच्या मुदतीनें कर्जे देण्यांत येत असतात; या कर्जावर दरसाल दर शेंकडा दोन, इतकें व्याज द्यावें लागतें.

---

**दुय्यम शिक्षणासाठी अधिक पैसा**—मध्यमिक समितीच्या शिफारसी अंमलांत आणण्यासाठी भारतीय सरकारनें २ कोटी रुपये मंजूर केल्याची बातमी आहे. उदयपूर येथें माध्यमिक शिक्षणाविषयीं चर्चा करण्यासाठी हेडमास्तरांची एक बैठक भरविण्यांत आली होती. बैठकीचें उद्घाटन करतांना ही बातमी भारतीय सरकारच्या एका प्रवक्त्यानें सांगितली

**ऑस्ट्रेलियांतील सर्जनची भेट**—मेलबोर्न येथील प्लॅस्टिक सर्जन मि. रॅंक हे सध्या भारताच्या सहा आठवड्याच्या दौऱ्यावर आहेत. नवीन कातडी बसविण्यासारख्या कांहीं शस्त्रक्रिया ते कलकत्ता, नागपूर व दिल्ली येथें करून दाखविणार आहेत. त्यांची भेट कोलंबो–योजनेचा एक भाग आहे.

### दूर पूर्वेस जाणारें व्यापारी-मंडळ

दूर पूर्वेकडील देशांशीं होणारा व्यापार वाढविण्यासाठी एक व्यापारी-प्रतिनिधीमंडळ आंध्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे त्या भागांत जाणार आहे. ह्या प्रतिनिधी मंडळांत मद्रासमधील १० व इतर ५-६ व्यापाऱ्यांचा समावेश करण्यांत येणार असून तें एप्रिलमध्यें दौऱ्यावर निघेल. मलाया, इंडोचीन हाँगकाँग, इत्यादि देशांशीं पूर्वी असलेले व्यापारी संबंध पुन्हा चालू करणें आणि नवीन संबंध प्रस्थापित करणें, असें काम प्रतिनिधीमंडळ करणार आहे. आंध्र राज्यांतील खनिजांची अतिपूर्वेकडील देशांत होणारी निर्यात वाढविणें आणि भारतीय तंबाखूची त्या भागांतील बाजारपेठ अधिक दृढ करणें, हा मंडळाचा प्रमुख हेतु आहे. ह्यापूर्वी अशाच प्रकारचें एक मंडळ त्या भागांत गेलें होतें आणि त्याच्या दौऱ्याचा उपयोगहि चांगला झाला होता. त्यामुळें तंबाखूची निर्यात वाढेल असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. प्रतिनिधी-मंडळ आपल्या दौऱ्यांत फोर्मोसलाहि भेट देण्याचा संभव आहे. चीनमध्यें भारतीय तंबाखूला कायमची बाजारपेठ मिळविणें कितपत शक्य आहे तें पाहण्याचा मंडळाचा विचार आहे. भारतानें जपानकडून अधिक प्रमाणांत आयात केली तर जपानकडून भारतामधील कातड्यांना, तागाच्या मालाला आणि चहाला हल्लीं आहे त्यापेक्षा अधिक मागणी येण्याचा संभव आहे. ह्याहि दृष्टीनें प्रतिनिधी-मंडळ खटपट करण्याचा संभव आहे. जपान हा देश छोट्या ग्रामोद्योगांना लागणाऱ्या हलक्या यंत्रसाहित्याबद्दल प्रसिद्ध आहे. भारतीय ग्रामोद्योगांना उपयोगी पडेल अशा प्रकारची यंत्रसामुग्री मिळविण्याचाहि मंडळाचा हेतु आहे.

### लोकसंख्येला आळा घालण्याची जरूरी

भारताचे ऑस्ट्रेलिआमधील माजी वकील डॉ. रघुनाथराव परांजपे ह्यांनीं लोकसंख्येच्या प्रश्नावर नगर येथील रोटरी क्लबापुढें भाषण केलें. ते म्हणाले कीं भारताची लोकसंख्या अतिशय वेगानें वाढत आहे. तिच्या वाढीला आळा घालण्यासाठीं योग्य ते उपाय योजले नाहींत तर निरनिराळ्या क्षेत्रांत करण्यांत येणारी प्रगति निरर्थक ठरेल. स्त्री-पुरुषांच्या अफाट संख्येनेंच केवळ राष्ट्राचें बळ वाढतें असें नव्हे. राज्य संस्थेनें लोकांना पुरेसें व सकस अन्न देणें हें तिचें कर्तव्यच आहे. अशा प्रकारचें अन्न पुरविण्यांत आलें तरच आपले लोक निरोगी, जोमदार आणि बुद्धिवान् असे होतील. वैद्यकीय व्यवसायांतील लोकांनीं आणि लोकसंख्याविषयक तज्ज्ञांनीं एकत्र येऊन जोरदार प्रयत्न करून वाढत्या लोकसंख्येला पायबंद घालण्याचें कार्य केलें पाहिजे. भारतांत निरुपयोगी गुरांची संख्याहि खूपच आहे. मानवी जीवनावर त्यांचेंहि फार मोठें ओझें आहे. ज्या गुरांची दूध देण्याची पात्रता अतिशय कमी आहे अशाहि गुरांना पोसावें लागतें. माणसांना सकस अन्न देण्याचें जमत नसतांना सुद्धा ह्या गुरांना खावयास घालावें लागत आहे. अहमदनगर येथील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजच्या संमेलनप्रसंगींहि त्यांनीं व्याख्यान दिलें. ह्या प्रसंगीं बोलतांना वैद्यकीय व्यवसायांतील लोकांना त्यांनीं अशी विनंति केली कीं, निरनिराळ्या वैद्यकीय उपचारपद्धतींचा तौलनिक अभ्यास त्यांनीं करावा आणि बुद्धिप्रधान दृष्टि ठेवून आधुनिक शास्त्रांचा अभ्यास करावा. जे डॉक्टर अगर वैद्य खेडेगांवांत जाण्यास तयार असतील, त्यांना सरकारनें आर्थिक मदत द्यावी, अशीहि सूचना त्यांनीं केली.


## दी मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

[ स्थापना १९१२ ]

मुख्य कचेरी:-टिळक पुतळ्याजवळ, महाल, नागपूर २

पुंजी

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. १६,५२,३०० |
| गंगाजळी व इतर फंड | रु. १७,५२,६१३ |
| ठेवी | रु. २,४३,४५,५६७ |
| जमीन गहाण बँकेचे कर्जरोखे | रु. ५०,००,००० |

खेळतें भांडवल रुपये ४ कोटींचे वर

अध्यक्ष :-श्री. रा. वि. काळीकर, एम्. ए.

★ मध्यप्रदेशांतील ४१ मध्यवर्ती सहकारी बँका ह्या बँकेला संलग्न झाल्या आहेत.

★ मध्यप्रदेशांतील केन्द्रीय जमीन गहाणी बँकेचें काम हीच बँक करते.

★ ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा मुख्यतः शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्या उपयोगासाठी दिला जातो.

### द. सातारा जिल्हा को. बोर्ड लि. सांगली

या संस्थेचे विद्यमानें प्रजासत्ताकदिन-समारंभ सकाळीं ७ वाजतां झेंडावंदनानें मे. मा. न. कार्लेकर अॅडव्होकेट, चेअरमन श्री. गणपती सहकारी खरेदी-विक्री सो. लि. सांगली यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. सदर प्रसंगीं अध्यक्षांनीं सर्वांनीं या झेंड्याचे खालीं एकत्र येऊन एकीच्या बळावर आपल्या पंतप्रधानाचे हात बळकट करून आपल्या राष्ट्राचा अभ्युदय घडवून आणावा म्हणून जमलेल्या मंडळीस कळकळीची विनंति केली.

### नाशिक येथें जिल्हा सहकारी बँक

नाशिक जिल्हा सें. को. बँकेची स्थापना नाशिक येथें करण्यांत येत आहे. ३ लक्ष रुपयांचें भागभांडवल जमा करण्याचा उत्पादकांचा संकल्प होता, पण त्यापेक्षा अधिक ४०,००० रुपयांचे शेअर्स खपले आहेत. प्रो. एस्. जी. पुराणिक ह्यांनीं बँकेच्या स्थापनेंत पुढाकार घेतला आहे.

### एक वर्षांत २०,००० आत्महत्या

१९५४ मध्यें, जपानमध्यें २०,००० लोकांनीं आत्महत्या केली. मृत्यूंच्या कारणांत आत्महत्येचा अनुक्रम नववा लागला.

### दुसऱ्या महायुद्धांतील जर्मन सैनिक

दुसऱ्या महायुद्धांत २७,३०,००० जर्मन सैनिक कामास आले, असें अधिकृत रीत्या प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. पूर्वेकडील सरहद्दीवर बेपत्ता असलेल्या सुमारें १० लक्ष सैनिकांचा वरील आकड्यांत समावेश नाहीं.

### तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची सोय


भारतीय रेल्वेच्या ज्या गाड्यांतून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंसाठीं झोपण्याचे डबे आहेत त्या डब्यांतून निळ्या प्रकाशाचे दिवे लावण्यांत येत आहेत. अशा नेहमींच्या दिव्याखेरीज हे दिवे जादा लावण्यांत येत आहेत. अशा डब्यांतून तोंड धुण्याची सोय पायखान्यांतून असतेच. पण त्याशिवाय डब्याच्या एका कोपऱ्यांत मुखमार्जनाची जादा सोय करण्यांत येणार आहे.

### सुरत जिल्ह्यांत पाटबंधारा

सुरत जिल्ह्यांत भीमपूर जवळ पावसाळ्याच्या पाण्यानें जमीन फार धुपून जाते असा अनुभव गेल्या जलप्रलयाच्या वेळीं आला. हें गांव समुद्राच्या कांठाजवळ आहे. जमिनीची धूप थांबविण्यासाठी १,७०० फूट लांबीचा एक बंधारा बांधण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. धरणासाठीं २·७५ लाख रुपये खर्च येईल.


किर्लोस्कर पॉवरवर चालणारा 'शरद' चरक

हा चरक चालविण्यास ८।१७ हॉ. पॉ. एंजिन लागते. दरेक तासास १२०० ते १५०० पौंड ऊस गाळला जातो. याशिवाय बैलावर चालणारे कमाल, करामत व पॉवरवर चालणारे



कोयना, वसंत, वगैरे चरक आहेत. पसंतीप्रमाणें निवड करा.
—सविस्तर माहितीसाठी लिहा.—
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
पृ. सं. १६८ ★ किंमत २॥ रु.

" आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन, त्यांतून महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक श्री. श्री. वा. काळे यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणुं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे. "
ग. वा. मावळंकर
लोकसभेचे अध्यक्ष
( " कण आणि क्षण " च्या गुजराती आवृत्तीच्या प्रस्तावनेंतील उतारा. )

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२१ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.
* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार-SANCOSOP
वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.
ना. द. कुलकर्णी
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.